ePaper
# पश्चिम आशियात पुन्हा युद्धाची चाहूल! ट्रम्प यांची इराणला थेट धमकी

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 23 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

'तात्पुरत्या' डम्पिंगने शहरात कचऱ्याचा स्फोट!

## लाठीहल्ला प्रकरणी राहुल गांधींचा जोरदार हल्लाबोल

# 'मोदींनी विद्यार्थ्यांची माफी मागावी!'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारवर शिक्षण व्यवस्थेच्या मुद्द्यावर जोरदार टीका केली. देशभरात वारंवार होत असलेल्या पेपरफुटीच्या घटनांवरून त्यांनी केंद्र सरकारला धारेवर धरत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशा तीन प्रमुख मागण्या त्यांनी मांडल्या.**


राहुल गांधी म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत देशात १५२ पेपरफुटीच्या घटना घडल्या असून त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. अनेक विद्यार्थी मानसिक तणावात गेले, तर काहींनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोपही त्यांनी केला. इतक्या गंभीर घटनांनंतरही दोषींवर प्रभावी कारवाई झालेली नाही, असा दावा त्यांनी केला.

पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी पहिली मागणी करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटविण्याची मागणी केली. देशातील परीक्षा व्यवस्था सांभाळण्यात ते पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप करत, त्यांच्या नेतृत्वाखाली पेपरफुटीच्या घटना सातत्याने वाढल्याचे त्यांनी सांगितले.

दुसऱ्या मागणीत त्यांनी दिल्लीतील आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जचा उल्लेख केला. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बलप्रयोग का करण्यात आला, लाठीचार्जचे आदेश कोणी दिले आणि त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

तिसऱ्या मागणीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट निशाणा साधला. देशातील शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी केंद्र सरकार जबाबदार असल्याचे सांगत, पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी राहुल गांधी यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावरही टीकेची झोड उठवली. त्यांच्या कार्यकाळात देशाची शिक्षण व्यवस्था कमकुवत झाल्याचा आरोप करत, विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्यांना काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत काँग्रेस ठामपणे उभी राहील, असेही त्यांनी सांगितले.





### राहुल गांधींनी कोणत्या तीन मागण्या केल्या?

१) "शिक्षणमंत्री म्हणून अपयशी ठरलेले धर्मेंद्र प्रधान यांना सर्वात आधी त्यांच्या पदावरून हटवा. शिक्षणमंत्र्यांना पदावरून हटवण्याची मागणी १०० टक्के रास्त आहे. यात काहीही चुकीचं नाही. जी व्यवस्था सांभाळण्यास आपण असमर्थ आहोत, हे त्यांनी अवघ्या भारताला दाखवून दिलं आहे. एकापाठोपाठ एक परीक्षेचे पेपर फुटत आहेत", असं म्हणत राहुल गांधी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

२) "ज्या व्यक्तीने आमच्या विद्यार्थ्यांकडे बोट दाखवलं, विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला, त्या लाठीचार्जचे आदेश कोणी दिले होते? त्या व्यक्तीला लाठीचार्जच्या घटनेसाठी जबाबदार धरा", अशी मागणी राहुल गांधी यांनी केली आहे.

३) "ही संपूर्ण यंत्रणा चालवणारी व्यक्ती, जे या संपूर्ण घटनांसाठी जबाबदार आहेत. ते म्हणजे पंतप्रधान मोदी. त्यांनी विद्यार्थ्यांची माफी मागितली पाहिजे", अशी मागणी राहुल गांधी यांनी केली आहे.

### राहुल गांधींची धर्मेंद्र प्रधान यांच्यावर टीका



"धर्मेंद्र प्रधान यांनी खऱ्या अर्थाने भारताची सर्वात मोठी संपत्ती उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला आहे. आपली शिक्षण व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न धर्मेंद्र प्रधान यांनी केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागण्यांचं आम्ही पूर्ण समर्थन करतो. तसेच रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे", असंही राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, राहुल गांधी यांच्या आरोपांवर आणि मागण्यांवर केंद्र सरकारकडून अधिकृत प्रतिक्रिया येणे अद्याप बाकी आहे. मात्र पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला आहे.



### 'गेल्या १० वर्षांत १५२ पेपर फुटले'

"देशात सध्या काय घडत आहे? आमच्या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यासारखं एवढं विद्यार्थ्यांनी काय केलं होतं? ते शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करत होते. त्यांचा कोणत्याही गुन्ह्याशी संबंध नव्हता. सध्या देशात पेपरफुटी ही खूप मोठी समस्या निर्माण झाली आहे. नीट पेपर फुटीच्या घटनेनंतर अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. अनेक विद्यार्थी नैराश्यात गेले आहेत. मागच्या १० वर्षांत १५२ पेपर फुटले आहेत, तरी देखील कोणावरही ठोस कारवाई झालेली नाही", असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

# अजितदादांचे विचारच पुढील वाटचालीची दिशा – तटकरे

## पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या उपक्रमातून विकास, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**महाईन्यूज । पुणे**

**राजकीय, सामाजिक, आर्थिक, क्रीडा, शिक्षण या विविध क्षेत्रात अजितदादा पवारांनी दिलेले योगदान अतुलनीय असून त्यांच्या अकाली जाण्याने राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. आपल्या राजकीय कारकिर्दीत प्रखर इच्छाशक्ती, सहनशीलता, दूरदृष्टीने कार्याचा ठसा उमटवला. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्हा शिक्षण मंडळाची वाटचाल गौरवास्पद आहे . येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत दादांच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुणे जिल्हा शिक्षण मंडळ चालवेल, असा ठाम विश्वास महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व खा. सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.**



महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वतीने सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने आयोजित पुणे ते बारामती राष्ट्रीय व राज्य स्तरीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारवाडा येथे खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, भाजप प्रदेश उपाध्यक्ष मा. राजेश पांडे, विधानसभा सदस्य आ. बापूसाहेब पठारे, आ. शंकरभाऊ आल्हाट, माजी आमदार व राष्ट्रवादी कॉंग्रेस पुणे शहर अध्यक्ष मा. सुनील टिंगरे, माजी आमदार विलास लांडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला आघाडी शहराध्यक्ष मा. कविता आल्हाट, आजीव सदस्य मा. अशोक खळदकर, मा. के. टी. सोनवणे यांच्यासह पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष मा. राजेंद्रजी घाडगे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य व मानद सचिव ॲड. संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रास्ताविकात मानद सचिव ॲड. संदीप कदम यांनी पुणे ते बारामती राष्ट्रीय व राज्य स्तरीय सायकल स्पर्धेचे हे दहावे वर्ष असून पुणे ते हडपसर पर्यंत सायकल रॅलीचे आयोजन केले असल्याचे नमूद करत सध्या आरोग्य, वाहतूक, पर्यावरण व स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असल्याकडे लक्ष वेधले. तसेच सदर रॅलीमध्ये सामाजिक बांधिलकेच्या जाणिवेतून पर्यावरण संदेश, प्लास्टिक मुक्त परिसर प्रदूषण, स्वच्छता, वाहतूक याबाबत जनतेला संदेश देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थी, शिक्षक, प्रतिष्ठीत नागरिक व जेष्ठ नागरिक यांच्यासाठी खुल्या या रॅलीमध्ये भर पावसात सुमारे ३५०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी आपला सक्रीय सहभागी झाले आहेत. या स्पर्धेसाठी देशभरातील राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील ४२५ स्पर्धक सहभागी झाले आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड यांनी केले तर आभार प्रदर्शन माजी आमदार विलास लांडे यांनी केले.

### ३,५०० हून अधिक सायकलपटूंचा सहभाग

पुणे–बारामती राष्ट्रीय व राज्यस्तरीय सायकल स्पर्धेच्या दहाव्या वर्षी देशभरातील ४२५ स्पर्धक सहभागी झाले. तर जनजागृती सायकल रॅलीत ३,५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवत पर्यावरण, स्वच्छता आणि वाहतूक शिस्तीचा संदेश दिला.

# पुणे 'ग्रोथ हब'च्या दिशेने; १८ विकास केंद्रांतून १५ ते १८ लाख रोजगारांचे लक्ष्य

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महानगराच्या पुढील २० वर्षांच्या नियोजित आणि संतुलित विकासासाठी 'पुणे ग्रोथ हब' प्रकल्पाअंतर्गत १८ 'ग्रोथ सेंटर' अर्थात विकास केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. या केंद्रांमुळे रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळणार असून, भविष्यात पुणे महानगराच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे. नीती आयोग आणि राज्य सरकारच्या पुढाकाराने राबविण्यात येणारा हा महत्त्वाकांक्षी विकास आराखडा अंतिम टप्प्यात असून, पुढील १८ महिन्यांत त्याला अंतिम रूप दिले जाणार आहे.**



'पुणे इंटरनॅशनल सेंटर'च्या सहकार्याने तयार होत असलेल्या या आराखड्यासाठी केंद्र सरकारने पुढील पाच वर्षांसाठी तब्बल पाच हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून रस्ते, वाहतूक व्यवस्था, मेट्रो परिसर आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांना प्राधान्य दिले जाणार आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड, पीएमआरडीए कार्यक्षेत्र आणि जिल्ह्याचा एकूण ६,९१५ चौरस किलोमीटर परिसर या प्रकल्पात समाविष्ट आहे. प्रत्येक विकास केंद्राचे नियोजन त्या परिसरातील औद्योगिक परिसंस्थेनुसार करण्यात येणार असून, चाकण, तळेगाव, रांजणगावसारख्या औद्योगिक पट्ट्यांसह कृत्रिम प्रज्ञा (एआय), सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहन उद्योगांवर विशेष भर दिला जाणार आहे.

पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी सांगितले की, या विकास आराखड्यात मेट्रो स्थानकांच्या परिसरासह महत्त्वाच्या ठिकाणी व्यवसाय व औद्योगिक विकास केंद्रे उभारली जातील. यामुळे रोजगारनिर्मितीबरोबरच पुणे महानगराच्या संतुलित आणि नियोजनबद्ध विकासाला गती मिळेल.

### संतुलित विकास साधणार

पुणे महानगरात १८ विकास केंद्रे विकसित करण्यात येणार आहेत. व्यवसाय केंद्रे आणि औद्योगिक केंद्रे म्हणून त्यांचा विकास केला जाईल. मेट्रो स्थानकांचा परिसर आणि महत्त्वाच्या ठिकाणी ही केंद्रे असतील. त्यातून रोजगारनिर्मितीबरोबरच महानगराच्या संतुलित विकासाला गती मिळेल, असे डॉ. अभिजित चौधरी यांनी स्पष्ट केले.

### पुणे ग्रोथ हब

पुणे महानगराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी 'ग्रोथ हब' हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. नीती आयोगाने मुंबईचा आर्थिक विकास आराखडा तयार केला होता. त्याच धर्तीवर 'ग्रोथ हब'अंतर्गत पुण्याचा आर्थिक विकास आराखडा तयार केला जात आहे. यात पुणे, पिंपरी-चिंचवड ही शहरे, जिल्हा आणि पीएमआरडीए कार्यक्षेत्र असून, एकूण सहा हजार ९१५ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून १५ ते १८ लाख नवीन रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. यात चाकण, तळेगाव, रांजणगाव पट्ट्यातील निर्मिती क्षेत्रासह भविष्यातील नवीन उद्योगांचाही विचार करण्यात येणार आहे. त्यात कृत्रिम प्रज्ञा (एआय), सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रिक वाहने ही क्षेत्रे केंद्रस्थानी असतील.

# 'तात्पुरत्या' डम्पिंगने शहरात कचऱ्याचा स्फोट!

## २५ मोकळ्या जागांवर कचऱ्याचे ढीग; दुर्गंधी, डास आणि साथीच्या रोगांचा वाढता धोका

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**मोशी येथील कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड शहरातील कचरा व्यवस्थापन अद्याप सुरळीत झालेले नाही. शहरात दररोज संकलित होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेला सध्या २० ते २५ मोकळ्या जागांचा तात्पुरता वापर करावा लागत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता, डासांचा प्रादुर्भाव आणि आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**



मोशी डेपो बंद झाल्यानंतर सुरुवातीला शहरातील कचरा देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या निगडी येथील तसेच खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या कासारवाडी येथील डेपोत टाकण्यात येत होता. मात्र, देहूरोड येथे कचरा स्वीकारणे बंद झाल्याने संपूर्ण भार खडकी डेपोवर आला असून, तेथील क्षमताही अपुरी पडत आहे. त्यामुळे महापालिकेने शहरातील विविध मोकळ्या जागांवर घंटागाड्या, डंपर आणि कॉम्प्रेसरच्या माध्यमातून कचरा साठवण्यास सुरुवात केली आहे.

नेहरूनगरमधील मयूर पॅनोरमा सोसायटी परिसर, पिंपरी बाजारपेठ, पिंपरी स्मशानभूमी परिसर, पवना नदीकाठ, काळेवाडी–चिंचवड पुलालगत, भाटनगर, विशालनगर, पिंपळे गुरव आदी भागांमध्ये कचऱ्याचे तात्पुरते डम्पिंग करण्यात येत आहे. या ठिकाणी दुर्गंधी वाढली असून, डासांचा प्रादुर्भाव तसेच मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

महापालिकेचे आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले की, मोशी डेपो बंद असल्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून खडकी डेपोचा वापर केला जात असून, उर्वरित कचऱ्यासाठी नाईलाजाने शहरातील २० ते २५ मोकळ्या जागांचा वापर करावा लागत आहे. मोशी डेपो पुन्हा सुरू झाल्यानंतर हा सर्व कचरा तेथे हलविण्यात येणार आहे.

> मोशी डेपो बंद असल्याने गेल्या काही दिवसांपासून पर्यायी व्यवस्था म्हणून देहूरोड आणि खडकी कॅन्टोन्मेंट्च्या जागांचा वापर करण्यात आला. सध्या खडकी येथे कचरा टाकला जात असून, उर्वरित कचऱ्यासाठी नाईलाजाने शहरातील २० ते २५ मोकळ्या जागांचा वापर करावा लागत आहे. मोशी डेपो सुरू झाल्यानंतर हा कचरा पुन्हा तेथे हलविण्यात येणार आहे.
>
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, आरोग्य विभाग महापालिका

दरम्यान, नेहरूनगर येथील मयूर पॅनोरमा सोसायटीचे रहिवासी नितीन काळे यांनी सांगितले की, सोसायटीलगत मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे.

त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, याबाबत स्थानिक नगरसेवक राहुल भोसले यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

### २० ते २५ ठिकाणी तात्पुरते डम्पिंग

मोशी कचरा डेपो बंद असल्याने शहरातील दररोजचा कचरा साठवण्यासाठी महापालिकेला २० ते २५ मोकळ्या जागांचा तात्पुरता वापर करावा लागत आहे. मात्र, या ठिकाणी दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव, मोकाट जनावरांचा वावर आणि अस्वच्छतेमुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, लवकरात लवकर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# 'ग्रीन' बसांची 'रेड' अवस्था; अचानक फेऱ्या रद्द, प्रवाशांचा संताप!

**महाईन्यूज ।** पिंपरी-चिंचवड

**पर्यावरणपूरक आणि आधुनिक वाहतूक म्हणून सुरू करण्यात आलेल्या पीएमपीएमएलच्या इलेक्ट्रिक बस सेवा सध्या वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे अडचणीत आल्या आहेत. विशेषतः निगडी येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बस स्थानकातून धावणाऱ्या इ-बस अचानक बंद पडत असल्याने अनेक फेऱ्या रद्द कराव्या लागत आहेत. मात्र, या फेऱ्या रद्द झाल्याची कोणतीही पूर्वसूचना प्रवाशांना दिली जात नसल्याने दररोज हजारो प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.**

> "बसमध्ये तांत्रिक बिघाड आढळल्यास प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन संबंधित फेरी रद्द केली जाते. बिघाड तातडीने दूर करून बस पुन्हा मार्गावर सोडण्यात येते."
>
> - यशवंत हिंगे, व्यवस्थापक, निगडी डेपो



> "तांत्रिक कारणामुळे बस रद्द करावी लागत असेल, तर किमान डिजिटल फलक किंवा ध्वनिक्षेपकाद्वारे प्रवाशांना माहिती द्यावी. त्यामुळे पर्यायी व्यवस्था करता येईल. मात्र, माहितीच मिळत नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होते."
>
> - चैताली कालदंते, प्रवासी

निगडी डेपो हा पिंपरी-चिंचवडमधील प्रमुख बस टर्मिनल असून, येथून पुणे शहरासह हिंजवडी, वाघोली, कात्रज, भोसरी, आकुर्डी, मामुर्डी, पुणे स्टेशन आणि महापालिका भवन या मार्गावर दररोज सुमारे १०० इलेक्ट्रिक बस धावतात. मेट्रो फीडर सेवाही मोठ्या प्रमाणात याच बसांवर अवलंबून आहे. मात्र, अनेक बस मार्गातच बंद पडत असल्याने किंवा डेपोतूनच बाहेर पडू शकत नसल्याने फेऱ्या रद्द होत आहेत.

फेऱ्या रद्द झाल्याची माहिती वेळेत मिळत नसल्याने बसस्थानकांवर गोंधळ निर्माण होत आहे. पुढील बस किती वेळाने येणार, याबाबतही कोणतीही प्रभावी माहिती व्यवस्था नसल्याने नोकरदार, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. विशेषतः हिंजवडी आयटी पार्क, वाघोली आणि हडपसरकडे जाणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांना याचा मोठा फटका बसत असून, कार्यालयात उशीर होणे आणि पर्यायी वाहनांवर अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

निगडी डेपोतून दररोज सुमारे ५७ हजार प्रवासी प्रवास करतात. महिन्याला तब्बल १७ लाख ७६ हजार प्रवासी या सेवेचा लाभ घेतात. या इ-बस दरमहा सुमारे ७ लाख ९० हजार किलोमीटर धावतात आणि पीएमपीएमएलला सुमारे अडीच कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवून देतात. एका इ-बसमधून दररोज सरासरी ५५० प्रवासी प्रवास करत असल्याने एक फेरी रद्द झाली तरी त्याचा थेट परिणाम प्रवाशांसह पीएमपीएमएलच्या उत्पन्नावरही होत आहे.

प्रवाशांनी बस रद्द झाल्यास डिजिटल फलक, मोबाईल संदेश किंवा ध्वनिक्षेपकाद्वारे तातडीने माहिती देण्याची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, तांत्रिक बिघाड आढळल्यास प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी संबंधित फेरी रद्द केली जात असून, दुरुस्तीनंतर बस पुन्हा सेवेत दाखल केली जाते, असे निगडी डेपो प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### रोजचाच खोळंबा, प्रवासी त्रस्त

निगडी डेपोतून दररोज सुमारे १०० इलेक्ट्रिक बस धावतात. या बसमधून ५७ हजारांहून अधिक प्रवासी प्रवास करतात, तर महिन्याला १७.७६ लाख प्रवासी या सेवेचा लाभ घेतात. मात्र, वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे फेऱ्या रद्द होत असून, पूर्वसूचना नसल्याने नोकरदार, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास बसस्थानकावर थांबावे लागत आहे. त्यामुळे पीएमपीएमएलने तांत्रिक देखभाल मजबूत करून बस रद्द झाल्यास तातडीने माहिती देण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.



## भूमिका

**लोकसभेच्या संभाव्य परिसीमनानंतर खासदारांची संख्या ५४३ वरून सुमारे ८५० करण्याचा प्रस्ताव चर्चेत आहे. वाढत्या लोकसंख्येला न्याय देण्यासाठी प्रतिनिधित्व वाढविण्याची गरज मान्य असली, तरी या निर्णयामुळे सुशासन अधिक सक्षम होईल की केवळ शासनाचा आकार वाढेल, हा मूलभूत प्रश्न उपस्थित झाला आहे.**

# मोठी लोकसभा, मोठे मंत्रिमंडळ... सुशासन कुठे?



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने मांडलेल्या 'शासन कमी, सुशासन अधिक' या तत्त्वाच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा अधिक महत्त्वाची ठरते. लोकशाहीत लोकप्रतिनिधित्वाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. लोकसंख्या वाढत असताना मतदारसंघांचे संतुलन राखणे आवश्यक असते. त्या दृष्टीने परिसीमन हा घटनात्मक आणि आवश्यक उपक्रम आहे. मात्र, केवळ लोकप्रतिनिधींची संख्या वाढविल्याने जनतेच्या समस्या कमी होतील, याची कोणतीही हमी नाही.

आजही अनेक मतदारसंघांमध्ये गैरहजेरी, अपुरा जनसंपर्क, विकासकामांतील विलंब आणि उत्तरदायित्वाचा अभाव या तक्रारी कायम आहेत. त्यामुळे संख्येपेक्षा कार्यक्षमतेवर भर देणे अधिक महत्त्वाचे ठरते. खासदार आणि आमदारांची संख्या वाढल्यास सरकारी खर्चातही मोठी वाढ होणार आहे. वेतन, भत्ते, कर्मचारी, कार्यालये, सुरक्षा, निवास, प्रवास आणि निवृत्तिवेतन अशा विविध बाबींवर हजारो कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडू शकतो. सार्वजनिक निधीचा वापर अधिक लोकप्रतिनिधी निर्माण करण्यासाठी करायचा की शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि रोजगारनिर्मितीसाठी, याचाही विचार करावा लागेल.

या विस्ताराचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे मंत्रिमंडळाचा संभाव्य विस्तार. संविधानानुसार मंत्र्यांची कमाल संख्या लोकसभेच्या सदस्यसंख्येच्या १५ टक्क्यांपर्यंत असू शकते. त्यामुळे मोठी लोकसभा म्हणजे अधिक मंत्री, अधिक मंत्रालये आणि अधिक प्रशासकीय यंत्रणा उभी राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत 'कमी शासन' या संकल्पनेशी हा विस्तार सुसंगत राहील का, हा प्रश्न स्वाभाविक आहे.

आजच्या डिजिटल युगात प्रशासनाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. थेट लाभ हस्तांतरण, ऑनलाइन सेवा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ई-गव्हर्नन्स आणि रिअल-टाइम देखरेख यांमुळे नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्यासाठी केवळ लोकप्रतिनिधींची संख्या वाढविणे हा एकमेव उपाय राहिलेला नाही. उलट पारदर्शकता, जबाबदारी आणि परिणामकारक अंमलबजावणी यांवर भर दिल्यास अधिक चांगले प्रशासन शक्य होऊ शकते. दरम्यान, दिल्लीचे पोलिस आयुक्त सतीश गोलचा यांची अचानक करण्यात आलेली बदली आणि त्यामागील कारणांबाबत सुरू असलेल्या चर्चेमुळे प्रशासनातील उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेचाही मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यावरील कारवाई ठोस कारणांसह आणि संस्थात्मक प्रक्रियेनुसार झाली, तरच जनतेचा प्रशासनावरील विश्वास दृढ राहतो. लोकशाहीमध्ये प्रतिनिधित्व वाढविणे आवश्यक असले, तरी त्याबरोबरच प्रशासन अधिक उत्तरदायी, पारदर्शक आणि परिणामकारक बनविणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे सरकारचा आकार वाढविण्यापेक्षा शासनाची गुणवत्ता वाढविण्यावर भर देणे, हाच खऱ्या अर्थाने सुशासनाचा मार्ग ठरेल.

## प्रासंगिक »

### माणुसकी

**संस्कृतचे महाकवी माघ हे अत्यंत दानशूर आणि परोपकारी होते. स्वतःची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही ते गरजूंना मदत करण्यास कधीही मागे हटत नसत.**

एकदा त्यांच्या गावातील एक गरीब माणूस मुलीच्या लग्नासाठी आर्थिक मदत मागण्यासाठी त्यांच्या घरी आला. महाकवींनी घरभर शोध घेतला, पण देण्यासारखे काहीच मिळाले नाही. शेवटी त्यांनी पत्नीच्या हातातील एक सोन्याचे कंकण काढून त्या गरिबाला दिले.

तो निघू लागला, तेवढ्यात महाकवींच्या पत्नीने त्याला थांबवले आणि आपल्या हातातील दुसरे कंकणही देत म्हणाली, "मुलीच्या लग्नात एकच कंकण कसे पुरेल? तिचे हात रिकामे राहू देऊ नकोस." या दांपत्याच्या उदार मनाने गरीब माणूस भारावून गेला आणि त्याने कृतज्ञतेने त्यांना साष्टांग नमस्कार केला. स्वतःकडे कमी असतानाही दुसऱ्याच्या अडचणीत धावून जाणे, निःस्वार्थपणे मदतीचा हात पुढे करणे आणि दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद मानणे, हीच खरी माणुसकी होय.

- तात्पर्य : आपली परिस्थिती नसतानाही दुस-याला मदत करणे हीच खरी माणुसकी.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात उभ्या राहिलेल्या तरुणाईने देशाचे लक्ष वेधले आहे. हजारो विद्यार्थी शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या मांडण्यासाठी रस्त्यावर उतरले.

# 'जंतर-मंतर'वरील तरुणाईचा आवाज आणि बदलाची दिशा



ही घटना केवळ आंदोलन नसून, नव्या पिढीच्या जागरूकतेचा आणि उत्तरदायी शासनाची अपेक्षा व्यक्त करणारा महत्त्वाचा संदेश आहे.लोकशाहीत नागरिकांना शासनाला प्रश्न विचारण्याचा आणि चुकीच्या धोरणांविरोधात आवाज उठवण्याचा अधिकार आहे. आजची 'जेन झी' ही केवळ सोशल मीडियावर प्रतिक्रिया देणारी पिढी नसून, प्रत्यक्ष मैदानात उतरून आपल्या हक्कांसाठी लढणारी पिढी असल्याचे या आंदोलनाने सिद्ध केले आहे.

सरकार हे जनतेने निवडलेले प्रतिनिधी असून, त्यांना जबाबदार धरण्याची जबाबदारीही नागरिकांचीच आहे, याची जाणीव या आंदोलनातून दिसून आली. मात्र, कोणतेही आंदोलन केवळ उत्स्फूर्ततेवर दीर्घकाळ टिकत नाही. शासनाकडून आश्वासने, समित्या आणि विलंबाची प्रक्रिया यामध्ये अनेक आंदोलने निष्प्रभ झाल्याची उदाहरणे इतिहासात आहेत.

त्यामुळे आंदोलनाला स्पष्ट दिशा, संघटनात्मक ताकद आणि दीर्घकालीन धोरण आवश्यक असते. केवळ निषेध नोंदवून प्रश्न सुटत नाहीत; त्यासाठी ठोस पर्याय आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असते. शिक्षण व्यवस्थेतील समस्या केवळ पेपरफुटीपुरत्या मर्यादित नाहीत. वाढते खासगीकरण, महागडे शिक्षण, गुणवत्तेतील घसरण, शिक्षण आणि रोजगारातील विसंगती, उच्च शिक्षणातील असमानता आणि अभ्यासक्रमातील विविध वादग्रस्त बदल यांसारखे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांसमोर आहेत. त्यामुळे या सर्व मुद्द्यांकडे व्यापक दृष्टीने पाहून उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांचे आंदोलन हे स्वाभाविकपणे सार्वजनिक धोरणांशी संबंधित असल्याने त्याला राजकीय संदर्भ असतो.

मात्र, त्याचा अर्थ पक्षीय राजकारणाशी जोडणे आवश्यक नाही. समाजहित, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि समान संधी यांसाठीचा संघर्ष ही लोकशाहीचीच ताकद आहे. त्यामुळे आंदोलनाचे केंद्रबिंदू विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा हेच राहिले पाहिजेत. जंतर-मंतरवरील तरुणाईने केवळ असंतोष व्यक्त केलेला नाही, तर बदलाची अपेक्षा आणि लोकशाहीवरील विश्वासही व्यक्त केला आहे. ही ऊर्जा योग्य दिशेने, अभ्यासपूर्ण विचारांनी आणि संघटित प्रयत्नांनी पुढे गेली तर शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवण्याची क्षमता तिच्यात निश्चितच आहे. देशाच्या भविष्यासाठी हीच सर्वात मोठी आशा म्हणावी लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



ब्रम्हादिक जया लाभासि ठेंगणे ।
बळिये आम्ही भले शरणागत ॥१॥

कामनेच्या त्यागें भजनाचा लाभ ।
जाला पद्मनाभ सेवाऋणी ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# २३ हजार रिक्त पदांमुळे पोलीस दलावर ताण!

## आरटीआयमधून धक्कादायक आकडेवारी; कायदा-सुव्यवस्थेसमोर मोठे आव्हान

**महाईन्यूज** । नागपूर

**राज्यातील कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलात मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची कमतरता असल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. ३० जून २०२६ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, पोलीस दलातील २ लाख २५ हजार ४६१ मंजूर पदांपैकी तब्बल २३ हजार ३२० पदे रिक्त असून, सर्वाधिक रिक्त पदे पोलीस शिपाई आणि पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील आहेत.**




### पोलीस दलातील रिक्त पदांचा आढावा

| | |
|---|---|
| एकूण मंजूर पदे | : २,२५,४६१ |
| कार्यरत कर्मचारी | : २,०२,१४१ |
| रिक्त पदे | : २३,३२० |
| पोलीस शिपाई रिक्त | : १६,५१६ |
| पोलीस उपनिरीक्षक रिक्त | : २,८७८ |
| सहायक पोलीस उपनिरीक्षक रिक्त | : १,५६२ |
| पोलीस निरीक्षक रिक्त | : ५२१ |
| पोलीस उपअधीक्षक रिक्त | : १८५ |

'असोसिएशन ऑफ सोशल अँड आरटीआय ॲक्टिव्हिस्ट्स' (आसरा) संस्थेचे अध्यक्ष संजय थुल यांनी माहिती अधिकारातून महाराष्ट्र पोलीस दलातील मंजूर, कार्यरत आणि रिक्त पदांची माहिती मागवली होती. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, सध्या २ लाख २ हजार १४१ कर्मचारी कार्यरत असून उर्वरित २३ हजार ३२० पदे रिक्त आहेत.

पोलीस शिपाई संवर्गात सर्वाधिक १६ हजार ५१६ पदे रिक्त असून, १ लाख २६ हजार ७०९ मंजूर पदांपैकी १ लाख १० हजार १९३ कर्मचारी कार्यरत आहेत. पोलीस उपनिरीक्षक संवर्गात ११ हजार ८८४ मंजूर पदांपैकी २ हजार ८७८ पदे रिक्त आहेत. सहायक पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपअधीक्षक संवर्गातही मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, २०२२ च्या शासन निर्णयानुसार पोलीस नाईक पदाचा पोलीस हवालदार संवर्गात समावेश करण्यात आल्यामुळे या संवर्गात मंजूर पदांपेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत असल्याचेही या आकडेवारीत नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील वाढती लोकसंख्या आणि भौगोलिक विस्तार लक्षात घेता रिक्त पदे तातडीने भरावीत, तसेच संयुक्त राष्ट्रांच्या निकषानुसार प्रति एक लाख लोकसंख्येमागे २२२ पोलिसांचे प्रमाण गाठण्यासाठी मंजूर पदसंख्या वाढवावी, अशी मागणी संजय थुल यांनी शासनाकडे केली आहे.

# विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राज्यभर एल्गार; वंचितची 'महाराष्ट्र बंद'ची घोषणा




**महाईन्यूज** । छत्रपती संभाजीनगर

**दिल्लीतील जंतरमंतर येथे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने २३ जुलै रोजी राज्यव्यापी 'महाराष्ट्र बंद'ची हाक दिली आहे. विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईचा निषेध नोंदविण्यासाठी आणि शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा बंद पुकारण्यात आल्याची माहिती पक्षाचे प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी मंगळवारी दिली.**

### वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख मागण्या

दिल्लीतील जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत वंचित बहुजन आघाडीने शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. आंदोलनकर्त्यांवरील पोलिस कारवाईचा निषेध करत शिक्षण व्यवस्थेत तातडीने सुधारणा कराव्यात, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि त्यांचा आवाज लोकशाही मार्गाने शासनापर्यंत पोहोचू द्यावा, अशी भूमिका पक्षाने मांडली आहे. या मागण्यांच्या समर्थनार्थ २३ जुलै रोजी राज्यव्यापी 'महाराष्ट्र बंद' पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सिद्धार्थ मोकळे यांनी सांगितले की, जंतरमंतरवर सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन सरकारला अधिक संवेदनशीलपणे हाताळता आले असते. मात्र, आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला आणि आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाला. लोकशाही व्यवस्थेत विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार असून, त्याऐवजी बळाचा वापर करणे निषेधार्ह असल्याचे त्यांनी म्हटले. एका मंत्र्याचा राजीनामा टाळण्यासाठी सरकारकडून सुरू असलेली धडपड लोकशाही मूल्यांना धक्का देणारी असल्याचा आरोपही त्यांनी केला.

दिल्लीतील या आंदोलनाचे नेतृत्व छत्रपती संभाजीनगरचे अभिजीत दिपके करत आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार आणि युवक मोठ्या प्रमाणात या आंदोलनाशी जोडले गेले आहेत. छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौकात नुकत्याच झालेल्या आंदोलनातही मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या समस्यांवर शासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

मोकळे यांनी पालकांनाही या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. "आपल्या मुलांचे भवितव्य सुरक्षित ठेवायचे असेल तर पक्ष, संघटना आणि विचारधारा बाजूला ठेवून या बंदला पाठिंबा द्यावा. विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त आहेत की नाहीत, याचा विचार प्रत्येक पालकाने करावा," असे ते म्हणाले.

वंचित बहुजन आघाडीच्या मते, गेल्या काही वर्षांत शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता घसरत चालली आहे. अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना अपेक्षित दर्जाचे शिक्षण मिळत नसल्याचा आरोप पक्षाने केला आहे. नियमित शिक्षणापेक्षा खासगी शिकवणी वर्गांवर विद्यार्थ्यांचे वाढते अवलंबित्व ही चिंतेची बाब असल्याचेही पक्षाने नमूद केले. या पार्श्वभूमीवर शिक्षण व्यवस्थेत सुधारणा व्हावी, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळावा आणि शासनापर्यंत त्यांचा आवाज पोहोचावा, यासाठी हा महाराष्ट्र बंद पुकारण्यात आल्याचे पक्षाने स्पष्ट केले.

दरम्यान, दिल्लीतील आंदोलनाला राज्यातील विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही पाठिंबा दर्शविला आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन अभिजीत दिपके यांची भेट घेतली. तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही आंदोलनस्थळी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना पाठिंबा दिला आहे. या पार्श्वभूमीवर २३ जुलै रोजीचा महाराष्ट्र बंद यशस्वी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने राज्यभरातील नागरिक, विद्यार्थी, पालक, सामाजिक संघटना आणि विविध घटकांना सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# अमरनाथ यात्रेवर दहशतीचा सावट!

## अनंतनागमध्ये हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी यांच्यावर गोळीबार; काश्मीरमध्ये हाय अलर्ट

**महाईन्यूज । श्रीनगर**

**अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेत तैनात असलेल्या जम्मू-काश्मीर पोलिसांच्या हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी यांच्यावर दहशतवाद्यांनी बुधवारी दुपारी दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील लाल चौक परिसरात अचानक गोळीबार केला. या भीषण हल्ल्यात त्यांना वीरमरण आले. या घटनेनंतर संपूर्ण काश्मीर खोऱ्यात सुरक्षा यंत्रणा सतर्क झाली असून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. हल्ल्यानंतर मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबविण्यात येत असून १,००० हून अधिक 'ओव्हर ग्राउंड वर्कर' (OGW) आणि संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी हे अमरनाथ यात्रेकरूंच्या सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी सांभाळत होते. त्याचवेळी दबा धरून बसलेल्या दहशतवाद्यांनी त्यांच्यावर अचानक अंधाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

हल्ल्याची माहिती मिळताच जम्मू-काश्मीर पोलिस, लष्कर आणि केंद्रीय सुरक्षा दलांनी संपूर्ण लाल चौक परिसराला वेढा घालत नाकाबंदी केली. परिसरातील सर्व प्रवेशमार्ग बंद करण्यात आले असून दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी संयुक्त शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. ड्रोन, श्वानपथक आणि विशेष पथकांच्या मदतीने जंगल व आसपासच्या भागात सखोल तपास सुरू आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जम्मू-काश्मीरचे पोलीस महासंचालक (DGP) नलीन प्रभात आणि पोलीस महानिरीक्षक (IGP) व्ही. के. बिरदी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित सुरक्षा यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून अमरनाथ यात्रेच्या मार्गावरील सुरक्षा आणखी मजबूत करण्यात आली आहे.

या हल्ल्यानंतर संपूर्ण काश्मीर खोऱ्यात दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी मोठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. सुरक्षा दलांनी विविध भागांत छापेमारी करत १,००० हून अधिक ओव्हर ग्राउंड वर्कर (OGW) आणि संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. दहशतवादी संघटनांना स्थानिक पातळीवर मदत करणाऱ्या नेटवर्कचा शोध घेण्यावर सुरक्षा यंत्रणांचा भर आहे.

दरम्यान, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी शहीद हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी यांच्या कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त करत, या हल्ल्यामागील दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही आणि त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही दिली. मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनीही शहीद जवानाला श्रद्धांजली अर्पण करत दहशतवादाविरोधातील लढा अधिक कठोरपणे सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

अमरनाथ यात्रा सुरू असताना झालेल्या या हल्ल्यामुळे यात्रेच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे. मात्र यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले असून, संपूर्ण यात्रामार्गावर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सुरक्षा यंत्रणांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

### काश्मीरमध्ये सुरक्षा यंत्रणा सतर्क

अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेत तैनात हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन कुरेशी यांच्या वीरमरणानंतर संपूर्ण काश्मीर खोऱ्यात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवत १,००० हून अधिक ओव्हर ग्राउंड वर्कर (OGW) आणि संशयितांना ताब्यात घेतले असून यात्रामार्गावरील सुरक्षा आणखी कडक करण्यात आली आहे.

## पश्चिम आशियात पुन्हा युद्धाची चाहूल! ट्रम्प यांची इराणला थेट धमकी

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव पुन्हा एकदा तीव्र झाला असून, दोन्ही देशांतील संघर्षामुळे पश्चिम आशियातील परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या शस्त्रसंधीनंतर पुन्हा हल्ल्यांच्या घटना घडत असल्याने युद्धाचे सावट गडद झाले आहे. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट इशारा देत, होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांवर हल्ला झाल्यास इराणमधील पूल आणि वीज प्रकल्प उद्ध्वस्त केले जातील, असे स्पष्ट केले आहे.**



डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर याबाबत भूमिका मांडली. त्यांनी म्हटले की, "इराणकडून होर्मुझ सामुद्रधुनीत एखाद्या जहाजावर क्षेपणास्त्र, रॉकेट, ड्रोन किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा हल्ला झाल्यास अमेरिका इराणमधील पूल आणि वीज प्रकल्पांवर अचूक हवाई कारवाई करेल. गरज पडल्यास तेहरान आणि आसपासच्या भागातील लक्ष्यांवरही कारवाई करण्यात येईल."

होर्मुझ सामुद्रधुनी ही जागतिक तेलवाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या मार्गावर निर्माण झालेला तणाव जागतिक व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि कच्च्या तेलाच्या किमतींवर थेट परिणाम करू शकतो. त्यामुळे या भागातील वाढत्या संघर्षाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

काही दिवसांपूर्वी अमेरिका आणि इराण यांच्यात संघर्ष थांबवण्यासाठी सामंजस्य करार झाला होता. मात्र त्यानंतरही दोन्ही बाजूंनी हल्ले सुरूच राहिल्याने शस्त्रसंधी प्रभावी ठरली नाही. अमेरिकेच्या कारवाईत इराणमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाल्याचा दावा करण्यात आला असून, त्यानंतर इराणनेही अमेरिकन हितसंबंध आणि त्यांच्या सहयोगी देशांवरील कारवाया तीव्र केल्या.

मागील आठवड्यात दोन्ही देशांमध्ये पुन्हा प्राणघातक हल्ल्यांची मालिका सुरू झाली. इराणने जॉर्डनमधील अमेरिकन लष्करी तळावर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला असून, त्यात अमेरिकेचे दोन जवान ठार झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर अमेरिकेनेही प्रत्युत्तरात्मक कारवाई केली. परिणामी, पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढला असून नव्या संघर्षाची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रणाच्या मुद्द्यावर इराण कोणतीही तडजोड करण्यास तयार नसल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे या भागातील लष्करी हालचाली वाढल्या असून, आंतरराष्ट्रीय समुदाय परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

### होर्मुझ सामुद्रधुनी का महत्त्वाची?

जागतिक कच्च्या तेलाच्या मोठ्या पुरवठ्याचा मार्ग असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतून दररोज लाखो बॅरल तेलाची वाहतूक होते. या मार्गावर कोणताही लष्करी संघर्ष किंवा जहाजांवरील हल्ला झाल्यास जागतिक व्यापार, इंधन पुरवठा आणि कच्च्या तेलाच्या किमतींवर तात्काळ परिणाम होऊ शकतो. त्यामुळे या सामुद्रधुनीतील वाढत्या तणावाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.



# शेवटच्या श्वासापर्यंत साथ देईन

अभिनेता, नृत्यदिग्दर्शक आणि सूत्रसंचालक राघव जुयाल आणि अभिनेत्री शहनाज गिल यांच्या नात्याबाबत गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर विविध चर्चा सुरू आहेत. दोघे अनेक कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसल्यामुळे ते एकमेकांना डेट करत असल्याच्या अफवा वारंवार समोर येत होत्या. मात्र, आता या चर्चांवर स्वतः राघव जुयालने स्पष्ट प्रतिक्रिया देत सर्व अफवांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे.

अलीकडेच राघवच्या आगामी 'भाई तेरा स्टार है' या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान त्याने एका मुलाखतीत शहनाज गिलसोबतच्या नात्याबद्दल मोकळेपणाने भाष्य केले. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमुळे या चर्चांना आणखी उधाण आले होते. त्या व्हिडिओमध्ये गर्दीतून बाहेर पडताना राघव शहनाजचा हात धरून तिला सुरक्षितपणे बाहेर नेताना दिसत होता. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अनेकांनी दोघे रिलेशनशिपमध्ये असल्याचा अंदाज व्यक्त केला होता. या चर्चांवर उत्तर देताना राघव म्हणाला की, कोणत्याही महिलेची सुरक्षितता ही त्याच्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे. आपल्या आई-वडिलांनी लहानपणापासून महिलांचा आदर करायला आणि गरज पडल्यास त्यांचे संरक्षण करायला शिकवले आहे. त्यामुळे आपल्या सोबत कोणतीही महिला असेल आणि तिच्यासोबत गैरवर्तन होत असेल, तर आपण कधीही शांत बसणार नाही, असे त्याने स्पष्ट केले.

राघव पुढे म्हणाला, "माझे मित्र, कुटुंबीय किंवा माझ्यासोबत असलेली कोणतीही महिला असो, तिच्या सुरक्षिततेसाठी मी शेवटच्या श्वासापर्यंत उभा राहीन." हे केवळ कर्तव्य नसून आपल्या स्वभावाचा आणि संस्कारांचा भाग असल्याचेही त्याने सांगितले. त्याने हेही स्पष्ट केले की, अशा प्रसंगी लोक काय विचार करतील किंवा आपल्या स्टार इमेजवर त्याचा काय परिणाम होईल, याचा तो विचार करत नाही.

# बॉलिवूडची 'हिरो' गर्ल करणार दमदार कमबॅक



८० आणि ९० च्या दशकात आपल्या सौंदर्याने आणि दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री आता पुन्हा एकदा अभिनयाच्या दुनियेत पुनरागमन करत आहेत. अमेरिकेतून मुंबईत परतल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच त्यांना मोठा ओटीटी प्रोजेक्ट मिळाला असून, त्या लवकरच प्राइम व्हिडिओच्या बहुचर्चित 'नानावटी व्हर्सेस नानावटी' या वेबसीरिजमध्ये महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. या कोर्टरूम ड्रामाचे दिग्दर्शन प्रसिद्ध निर्माते-दिग्दर्शक विपुल शाह करत असून, या मालिकेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे 'हिरो' या सुपरहिट चित्रपटातील गाजलेली जोडी मीनाक्षी शेषाद्री आणि जॅकी श्रॉफ तब्बल ४० वर्षांनंतर पुन्हा एकत्र स्क्रीन शेअर करणार आहे. त्यामुळे या सीरिजबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. अमेरिकेत अनेक वर्षे वास्तव्यानंतर मीनाक्षी शेषाद्री नुकत्याच मुंबईत कायमस्वरूपी परतल्या आहेत. अभिनयात पुनरागमन करण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांना लगेचच या वेबसिरीजची ऑफर मिळाली. १९८३ मध्ये सुभाष घई यांच्या 'हिरो' चित्रपटातून त्या रातोरात स्टार बनल्या होत्या. आता चार दशकांनंतर जॅकी श्रॉफसोबत त्यांना पुन्हा पाहण्याची संधी चाहत्यांसाठी खास ठरणार आहे. निर्मात्यांनी दोघांच्या वयानुरूप भूमिका साकारल्याचे सांगितले जात असून, त्यामुळे कथेत नॉस्टॅल्जियासोबतच नवेपणाचाही अनुभव मिळणार आहे. आठ भागांच्या या क्राइम-कोर्टरूम ड्रामाचे चित्रीकरण सध्या मुंबईतील अंधेरी येथे सुरू असून, पुढील टप्प्यात पवई परिसरात शूटिंग होणार आहे. या वेबसिरीजमध्ये भाग्यश्री, राम कपूर आणि अनुप्रिया गोएंका यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.




# देवा विठ्ठला' भक्तिगीतातून विठ्ठलभक्तीचा आविष्कार!

आषाढी वारीच्या भक्तिमय वातावरणाला साजेसा, श्री विठ्ठल-रखुमाई यांच्या चरणी समर्पित "देवा विठ्ठला" हा भावस्पर्शी भक्तिगीत नुकताच प्रदर्शित झाला असून, वारकरी संप्रदायातील भक्ती, पंढरीच्या दर्शनाची ओढ आणि विठ्ठलनामाचा गजर यांचे हृदयस्पर्शी चित्रण या गीतातून करण्यात आले आहे. या भक्तिगीताचे विशेष आकर्षण म्हणजे संगीत दिग्दर्शक श्रेयस देशपांडे यांनी दिलेले सुरेल, पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुंदर संगम साधणारे संगीत. टाळ-मृदुंगाच्या नादासह भक्तिभाव अधिक खुलवणाऱ्या संगीत संयोजनामुळे हे गीत प्रत्येक वारकऱ्याच्या मनाला स्पर्श करते. संगीत संयोजन, कीबोर्ड आणि गिटारची जबाबदारीही श्रेयस देशपांडे यांनी सांभाळली आहे. गीताला आपल्या मधुर, भावपूर्ण आणि भक्तिरसाने ओथंबलेल्या आवाजाने जीवनदान देणाऱ्या गायिका सावनी रविंद्र यांच्या गायकीने "देवा विठ्ठला" अधिक प्रभावी बनले आहे. त्यांच्या सुरेल सादरीकरणामुळे गीतातील प्रत्येक शब्द श्रोत्यांच्या मनात थेट पोहोचतो. या गीताचे शब्द डॉ. प्रचिती गोरे-भागवत यांनी लिहिले असून, विठ्ठलभक्तीतील आर्तता, प्रेम आणि समर्पण यांचा सुंदर आविष्कार त्यांनी गीतातून मांडला आहे. सुचेता गोसावी, मानली राज्याध्यक्ष आणि कांचन साळुंखे यांनी कोरस गायन केले आहे. ध्वनिमुद्रण श्रेयस रेकॉर्ड्स स्टुडिओ आणि टिंब्रेवर्ल्ड स्टुडिओ येथे झाले असून, तुषार पंडित आणि आयुष अडंगळे यांनी रेकॉर्डिंगची जबाबदारी सांभाळली. गीताचे मिक्सिंग आणि मास्टरिंग आयुष अडंगळे यांनी केले आहे. या गीताचा व्हिडिओ शुभ्रांशू डोंगावणकर (EightMedia) यांच्या दिग्दर्शनाखाली साकारला असून, संपादन उदय बोईनवाड, तर ग्राफिक्स रोशन इंगळे आणि शुभ्रांशू डोंगावणकर यांनी केले आहेत. पंढरपूर व वारकरी परंपरेचे मनोहारी दृश्य टिपण्यासाठी उन्मेष कोर्डे, मंगेश ढोले, EightMedia, कृष्णा वाजगे, ओम लोकारे, ओम सरडे आणि स्वप्नील बारगे यांचे विशेष योगदान लाभले आहे. EightMedia यांनी या प्रकल्पासाठी डिजिटल मार्केटिंग पार्टनर म्हणून काम पाहिले असून, डॉ. सुशांत पाटील ग्रुप आणि ॲड. अनुजा सुशांत पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. "Presented by Shreyas Records" या बॅनरखाली प्रदर्शित झालेले "देवा विठ्ठला" हे भक्तिगीत वारकरी संप्रदायाची परंपरा, विठ्ठलभक्तीची ओढ आणि अध्यात्मिक भावविश्व नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा एक सुंदर प्रयत्न ठरत असून, संगीतप्रेमी आणि विठ्ठलभक्तांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# 'कमबॅक किंग' अर्जेंटिना!

## फिफा वर्ल्डकप २०२६; नॉर्वेचा Viking अन् इंग्लंडचा King ही रेसमध्ये

**महाईन्यूज | पोर्तुगल**

**तुम्ही जर फुटबॉलचे चाहते असाल आणि तुमचे हृदय कमजोर असेल, तर यंदाच्या विश्वचषकात अर्जेंटिनाचे सामने पाहणे म्हणजे तुमच्यासाठी एक मोठी कसोटीच ठरली असती! स्पर्धेतून कधीही गाशा गुंडाळावा लागेल अशा बिकट परिस्थितीतून मार्ग काढत, गतविजेत्या अर्जेंटिनाने पुन्हा एकदा विश्वचषकाच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. 'ला अल्बिसेलेस्ते' (आकाशी निळा आणि पांढरा संघ) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संघाला फुटबॉल जगतात 'कमबॅक किंग' का म्हणतात, याचा थरार संपूर्ण जगाने अनुभवला.**



### गोल्डन बूटच्या स्पर्धेत आघाडीवर असलेले खेळाडू

| | |
|---|---|
| किलियन एम्बाप्पे - | ८ गोल ३ असिस्ट |
| लिओनेल मेस्सी - | ८ गोल १ असिस्ट |
| अर्लिंग हालँड - | ७ गोल ० असिस्ट |
| हॅरी केन - | ६ गोल १ असिस्ट |
| उस्मान डेम्बेले - | ५ गोल २ असिस्ट |

या विश्वचषकातील अर्जेंटिनाचा प्रवास एखाद्या बॉलिवूड ब्लॉकबस्टर सिनेमापेक्षा कमी नव्हता. 'राउंड ऑफ ३२' मध्ये नवख्या केप व्हर्डे संघाने गतविजेत्यांना थेट अतिरिक्त वेळेत खेचून २-२ अशा बरोबरीत रोखले होते. पण, दबावाखाली कसे खेळायचे हे ठाऊक असलेल्या अर्जेंटिनाने अखेर ३-२ ने सामना खिशात घातला.

पण खरा थरार तर 'राउंड ऑफ १६' मध्ये पाहायला मिळाला. इजिप्तविरुद्धच्या सामन्यात अखेरची १० मिनिटे शिल्लक असताना अर्जेंटिना ०-२ असा पिछाडीवर होता. कोणत्याही संघाचे अवसान गळावे अशा या क्षणी ऑप्टाच्या आकडेवारीनुसार अर्जेंटिनाच्या विजयाची शक्यता अवघी ०.६% उरली होती! मात्र, त्यानंतर फुटबॉलच्या इतिहासातील सर्वात अविश्वसनीय चमत्कार घडला. अर्जेंटिनाने निर्धारित वेळेतच सलग ३ गोल डागत ३-२ ने विजय खेचून आणला. विश्वचषकाच्या इतिहासात अतिरिक्त वेळेत न जाता, २ गोलने पिछाडीवर असताना निर्धारित वेळेत सामना जिंकण्याचे हे आजवरचे सर्वात थरारक पुनरागमन ठरले.

उपांत्य फेरीत अर्जेंटिनासमोर त्यांचा कट्टर प्रतिस्पर्धी इंग्लंड उभा होता. सामन्याचा पूर्वार्ध कमालीचा संथ झाला. दोन्ही संघांनी बचावात्मक पवित्रा घेतल्यामुळे पहिल्या ३० मिनिटांत एकही शॉट लागला नाही, जो १९६६ नंतरचा एक विक्रमच ठरला. मध्यंतरापर्यंत सामना ०-० असाच होता.

पण उत्तरार्धात सामन्याने अचानक कात टाकली. ५५ व्या मिनिटाला इंग्लंडच्या अँथनी गॉर्डनने गोल केला आणि अटलांटाच्या स्टेडियममध्ये एकच जल्लोष झाला. इंग्लंड १-० ने आघाडीवर होते आणि अर्जेंटिना बॅकफूटवर गेला होता.

# यजमान इंग्लंडचा ३-० फरकाने एकतर्फी मालिकाविजय

**महाईन्यूज | ब्रिस्टॉल**

**कर्णधार हॅरी ब्रूक (नाबाद ७९) व फिल सॉल्ट (नाबाद ५९) यांच्या झंझावाती अर्धशतकांच्या बळावर इंग्लंडने भारतीय संघाचा चौथ्या टी-२० लढतीतही एकतर्फी धुव्वा उडविला आणि पाच सामन्यांची ही मालिका ३-० अशा फरकाने खिशात घातली. पहिला सामना पावसामुळे रद्द करावा लागल्यानंतर भारताने या मालिकेत सलग तीन पराभव पत्करले आहेत.**



### ब्रूक आणि सॉल्ट यांची धडाकेबाज फलंदाजी

**मात्र, भारताच्या गोलंदाजांना इंग्लंडच्या आक्रमक फलंदाजीपुढे अपेक्षित प्रभाव पाडता आला नाही आणि सामन्यावरची पकड सुरुवातीपासूनच सुटली. हॅरी ब्रूक आणि फिल सॉल्ट यांच्या धडाकेबाज फलंदाजीमुळे इंग्लंडने भारतीय गोलंदाजांवर पूर्णपणे वर्चस्व गाजवत सामना एकतर्फी केला. या पराभवामुळे भारतीय संघाला फलंदाजीबरोबरच गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील त्रुटींवरही गंभीरपणे काम करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. श्रेयस अय्यरच्या झुंजार खेळीला अन्य फलंदाजांची अपेक्षित साथ लाभली नाही.**

श्रेयस अय्यरच्या नाबाद ८० धावांच्या खेळीनंतरही भारताला ७/१५८ अशा किरकोळ धावसंख्येवर समाधान मानावे लागले. प्रत्युत्तरात इंग्लंडने १३.५ षटकांत केवळ एका गड्याच्या बदल्यातच विजयाचे लक्ष्य गाठले. हॅरी ब्रुकने ३५ चेंडूंत ८ चौकार व ४ षटकारांसह नाबाद ७९ धावा चोपल्या. तर सॉल्टने ४२ चेंडूंत ५९ धावांची आतषबाजी केली. यादरम्यान, हॅरी ब्रूकचा स्ट्राईकरेट २२५.७१ असा राहिला.

प्रारंभी, कर्णधार श्रेयस अय्यरने एकहाती डाव सावरत ४९ चेंडूंमध्ये नाबाद ८० धावांची वादळी खेळी खेळली आणि याचमुळे इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या टी-२० सामन्यात भारताला २० षटकांत ७ बाद १५८ धावांपर्यंत मजल मारता आली. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, खराब प्रारंभाचा संघाला फटका बसला. इंग्लंडच्या गोलंदाजांनी 'शॉर्ट बॉल' रणनीतीचा अचूक वापर करत भारताच्या सलामीवीरांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.

युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी १० चेंडूंत १५ धावांवर जोफ्रा आर्चरचा बळी ठरला, तर इशान किशन केवळ ४ धावांवर जोश टंगच्या गोलंदाजीवर बाद झाला. दोन झटके बसल्यानंतर कर्णधार श्रेयस अय्यर आणि शिवम दुबे यांनी चौथ्या गड्यासाठी ५३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. शिवम दुबेने २३ चेंडूंत २२ धावांचे योगदान दिले.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। गुरुवार ।
दि. 23 जुलै 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# सनव्ह्यूह सोसायटी परिसरातील धोका टळला!

## नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य : माजी महापौर डॉ. वैशाली घोडेकर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक ९ मधील उद्यमनगर येथील सनव्ह्यूह सोसायटी परिसरात झाडांच्या सुकलेल्या व धोकादायक फांद्या लोंबकळत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या फांद्या कोणत्याही क्षणी कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली होती.**





**“नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च जबाबदारी आहे. पावसाळ्याच्या काळात झाडांच्या धोकादायक फांद्या कोसळून अपघात होण्याची शक्यता अधिक असते. उद्यमनगर परिसरातील नागरिकांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कार्यवाही करण्यात आली. भविष्यातही नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित कोणतीही समस्या निर्माण झाल्यास त्यावर तत्काळ उपाययोजना करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”**

**- वैशाली घोडेकर- लोंढे, माजी महापौर.**

या गंभीर समस्येची तातडीने दखल घेत माजी महापौर तथा प्रभाग क्रमांक ९ च्या माजी नगरसेविका डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे यांनी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

डॉ. घोडेकर-लोंढे यांच्या पाठपुराव्यानंतर संबंधित अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या उपस्थितीत धोकादायक व सुकलेल्या फांद्या सुरक्षितरीत्या हटविण्यात आल्या. तसेच भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी झाडांच्या आवश्यक त्या फांद्यांची छाटणी करण्यात आली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांमध्ये झाडांच्या फांद्या कोसळण्याच्या घटना घडत आहेत. अशा परिस्थितीत उद्यमनगर परिसरातील नागरिकांनी ही समस्या निदर्शनास आणून दिल्यानंतर डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे यांनी कोणताही विलंब न लावता प्रशासनाला सतर्क केले. त्यांच्या तत्परतेमुळे संभाव्य अपघाताचा धोका टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे या नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करत असून, पावसाळ्यात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण करणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष न करता अशा तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी त्या सातत्याने प्रशासनाशी समन्वय साधत आहेत. यापुढेही परिसरातील नागरिकांनी अशा धोकादायक झाडांच्या फांद्या, पाणी साचणे किंवा इतर नागरी समस्यांची माहिती तात्काळ द्यावी, जेणेकरून वेळेत उपाययोजना करता येतील. नागरिकांच्या सुरक्षिततेसह परिसरातील मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे यांचा पाठपुरावा यापुढेही अशाच तत्परतेने सुरू राहणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया पुणेचे गुणवत्ता व्यवस्थापन कन्व्हेन्शन उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**विविध उद्योग संस्थांमधील उत्पादने, सेवा आणि कार्यप्रक्रियांच्या गुणवत्तेत सातत्यपूर्ण सुधारणा घडवून ग्राहकांच्या अपेक्षांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या पुणे शाखेतर्फे आयोजित करण्यात आलेले ‘गुणवत्ता व्यवस्थापन कन्व्हेन्शन-२०२६’ उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडले.**



## गुणवत्ता व्यवस्थापनाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण भूमिका

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजया रुमाले यांनी केले. रहीम मिर्झा बेग, प्रशांत बोराटे आणि चंद्रशेखर रुमाले यांनी कन्व्हेन्शनच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. गुणवत्ता व्यवस्थापनाच्या माध्यमातून उद्योगांनी अधिक परिणामकारक आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी अशा कन्व्हेन्शनची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. सहभागी संस्थांनी आपले विविध नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर करत उद्योग क्षेत्रात गुणवत्ता संस्कृती अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला.

भोसरी येथील एक्सलन्स सेंटरमध्ये झालेल्या या कन्व्हेन्शनमध्ये ३८ उद्योगसंस्थांमधील तब्बल ४८१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवून गुणवत्ता व्यवस्थापनातील नावीन्यपूर्ण संकल्पना आणि उपक्रमांचे सादरीकरण केले.

या कन्व्हेन्शनमध्ये केस स्टडी, स्लोगन आणि पोस्टर या तीन गटांमध्ये एकूण १९५ नामांकने प्राप्त झाली होती. सहभागी उद्योगसंस्थांच्या सदस्यांनी गुणवत्ता सुधारणा, उत्पादकता वाढ, ग्राहक समाधान आणि कार्यक्षम व्यवस्थापन यासंदर्भातील विविध विषयांवर आपले कौशल्यपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळविली.

कन्व्हेन्शनचे उद्घाटन बॉश चेसिस सिस्टिम्स इंडिया कंपनीचे वरिष्ठ पदाधिकारी जगदीप सिंग बिरदी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. समारोप सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एसकेएफ इंडिया इंडस्ट्रियलचे वरिष्ठ अधिकारी प्रमोद कुलकर्णी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विविध स्पर्धांतील विजेत्या संघांना गुणवत्तेच्या निकषांवर सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके तसेच स्मृतिचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे, पुणे शाखा परिषद सदस्य माधव बोरवणकर, पवनकुमार रौंदळ, धनंजय वाघोलीकर तसेच परवीन तरफदार आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील केस स्टडी सादरीकरणाचे मूल्यमापन अजय अंबिके, प्रभाकर चोपडे, ऋतू मेहता, धनंजय वाघोलीकर, पंकज बडगुजर, पवन गुजराती, संजय लकडे, चंद्रशेखर बापट, प्रशांत मुधळवाडकर, व्यंकटेश राव, विठ्ठल वाघचौरे, पवनकुमार रौंदळ आणि माधव बोरवणकर यांनी केले. तर स्लोगन आणि पोस्टर गटांचे मूल्यमापन राहुल गुरुळे आणि ललिता परदेशी यांनी केले.

# Books vs. Screens: Which Is Better?



**"A reader lives a thousand lives before he dies. A learner who uses technology wisely discovers a thousand more." The world of education is changing faster than ever before. Not long ago, books were the only source of knowledge for students. Today, with just a click, we can attend online classes, watch educational videos, read e-books, and explore information from every corner of the world. As technology continues to shape our lives, an interesting question often arises—Which is better: books or screens?**

Books have been our trusted companions for generations. Every page we turn introduces us to new ideas, different cultures, and valuable life lessons. Reading a book requires patience, concentration, and imagination. Unlike digital devices, books do not interrupt us with notifications or advertisements. They allow us to focus deeply, helping us understand concepts better and remember them for a longer time. The joy of holding a book, highlighting important lines, and turning each page is an experience that many readers still treasure.

On the other hand, screens have transformed learning in remarkable ways.

Today, students can access online libraries, educational websites, virtual laboratories, and interactive lessons from anywhere in the world. Difficult topics become easier to understand through videos, animations, and simulations. Technology has made education more accessible, especially for students who may not have easy access to books or coaching classes. It has opened doors to opportunities that were once beyond our imagination.

Priyadarshani SCHOOL & JR. COLLEGE

However, every coin has two sides. While screens offer convenience and speed, they can also become a source of distraction. A student who picks up a phone to study may soon find themselves checking social media, watching videos, or playing games. Spending too much time in front of a screen may also lead to eye strain, disturbed sleep, and reduced physical activity. Technology is undoubtedly powerful, but it must be used with discipline and self-control.

Does this mean books are perfect? Not entirely. Printed books can sometimes become outdated, and carrying several textbooks every day can be tiring. In comparison, a single tablet or laptop can store thousands of books and provide updated information instantly. This shows that both books and screens have their own strengths and limitations.

Instead of debating which one is better, perhaps we should learn how to use both wisely. Books help us develop imagination, critical thinking, and the habit of deep reading, while screens make learning interactive, quick, and globally connected. Together, they complement each other and create a balanced learning experience.

As students preparing for the future, we should remember that success does not depend on whether we study from paper or pixels. It depends on our curiosity, dedication, and willingness to learn. A book can inspire us with timeless wisdom, while technology can connect us to endless possibilities. The real power lies not in choosing one over the other, but in knowing when and how to use each effectively.

In the end, books build the foundation of knowledge, while screens expand its horizons. A wise student is not the one who chooses between them, but the one who learns to make the best use of both.

Sanchi Sanjay Rathod
Grade X (Ionian)
Priyadarshani School
Moshi

## Priyadarshani School, Moshi Organized Interactive Drone Technology Workshop

**MahaEnews I PIMPRI-CHINCHWAD**

**Priyadarshani School, Moshi Successfully organized an interactive Drone Technology Workshop for the students of the grade 5 and 6 in collaboration with GDIOT Technology, Pune.**



The workshop was conducted by an expert trainer from GDIOT Technology, who introduced students to the fundamentals of drone technology, its working principles, components, and the latest advancements in the field. Students also gained insights into the wide-ranging applications of drones in agriculture, defence, disaster management, aerial photography, surveying, logistics, and environmental monitoring.

A live drone demonstration was the highlight of the programme, providing students with a practical understanding of drone operations and making the learning experience highly engaging and interactive. Students participated enthusiastically, asked insightful questions, and displayed keen interest in exploring this rapidly evolving technology.

The workshop aimed to nurture scientific curiosity, innovation, and problem-solving skills while encouraging students to explore future career opportunities in robotics, artificial intelligence, drone technology, and allied STEM fields.

The school management, Principals, and teaching staff appreciated the initiative for offering valuable hands-on exposure beyond the classroom and promoting experiential learning among students.

The programme concluded with a heartfelt vote of thanks to the trainers from GDIOT Technology, Pune, for conducting an enriching, informative, and memorable workshop that inspired students to embrace the technologies of the future.

# केवळ विरोधासाठी विरोध की शहरहिताचा विचार?

## १६ एकरांचा प्रस्ताव स्थगित करण्याची मागणी; मात्र कचऱ्यावर प्रक्रिया कुठे करणार

**महाईन्यूज** | पिंपरी- चिंचवड

**मोशी कचरा डेपोतील दुर्घटना ही संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी वेदनादायी आणि धक्कादायक घटना आहे. या दुर्घटनेत निरपराध कामगारांचा जीव गेला असून दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यकच आहे. मात्र, या दुर्घटनेचे भांडवल करून संपूर्ण शहराच्या कचरा व्यवस्थापन धोरणालाच विरोध करणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.**




'मोशीवर पुन्हा कचऱ्याचा भार नको' ही भावना मान्य असली, तरी शहरातील दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे १५०० मेट्रिक टन कचऱ्याचे काय करायचे? हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. १६ एकरांचा प्रस्ताव स्थगित करण्याची मागणी करणारे राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे यांनी शहरासाठी पर्यायी आराखडाही मांडणे गरजेचे आहे. केवळ विरोधाची भूमिका घेऊन लोकांच्या भावनांना हात घालणे आणि शहराच्या मूलभूत समस्येकडे दुर्लक्ष करणे, हे जबाबदार लोकप्रतिनिधींना शोभणारे नाही. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ४० लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरात दररोज १५०० मेट्रिक टनांहून अधिक कचरा निर्माण होतो. हा कचरा ना गायब होणार आहे, ना शहराबाहेर कुठे जादूने जाणार आहे. त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करणे ही महापालिकेची कायदेशीर जबाबदारी आहे. सर्वोच्च न्यायालय, राष्ट्रीय हरित लवाद (NGT) आणि घनकचरा व्यवस्थापन नियमावलीनुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला आपल्या हद्दीतील कचऱ्याचे व्यवस्थापन करणे बंधनकारक आहे. म्हणूनच, कचरा प्रक्रिया प्रकल्प हा पर्याय नसून गरज आहे. प्रश्न एवढाच आहे की, तो पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि विकेंद्रित पद्धतीने कसा उभारला जाईल?

महापालिका प्रशासनाने देहूरोड येथील कलामंदिर हॉटेलजवळची जागा, पुनावळे येथील सुमारे ८० एकर जागा तसेच अन्य काही पर्यायी जागांचा विचार सुरू केला आहे. विकेंद्रित कचरा व्यवस्थापन, बायोमायनिंग, वेस्ट टू एनर्जी प्रकल्प, बायोगॅस प्रकल्प, डी-ओडोरायझेशन यंत्रणा, प्रदूषण नियंत्रण उपाययोजना आणि पर्यावरणीय निकषांची पूर्तता करून कचरा व्यवस्थापनाचा आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अशा परिस्थितीत, कोणत्याही पर्यायाला संधी न देता सरसकट विरोध करणे ही भूमिका शहरहिताची म्हणता येणार नाही. मोशीकरांनी गेली अनेक वर्षे दुर्गंधी, वायू प्रदूषण, लिचेट, भूजल प्रदूषण आणि विविध आरोग्यविषयक समस्यांचा सामना केला आहे. त्यामुळे त्यांच्या भावना रास्त आहेत. मात्र, त्याचा अर्थ शहरात कुठेही कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारायचा नाही, असा होत नाही. उलट, मोशी दुर्घटनेतून धडा घेत अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे. कारण, उद्या शहरभर कचऱ्याचे ढीग साचले, तर त्याचा परिणामही लाखो नागरिकांच्या आरोग्यावर होणार आहे.

### शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करूनच प्रकल्प

१६ एकरांचा प्रस्ताव स्थगित करण्याची मागणी करणाऱ्यांनी पुढील प्रश्नांची उत्तरेही शहराला द्यायला हवीत :

1.दररोजच्या १५०० मेट्रिक टन कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करणार?
2.कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी पर्यायी जागा कोणती?
3.कचऱ्यावर प्रक्रिया न झाल्यास शहरात निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या संकटाची जबाबदारी कोण घेणार?
4.सर्वोच्च न्यायालय आणि NGT च्या निर्देशांचे पालन कसे होणार?
5.कचरा व्यवस्थापनासाठी आर्थिक आणि तांत्रिक आराखडा काय आहे?

या प्रश्नांची उत्तरे न देता केवळ विरोधाची भूमिका घेणे हे शहराला दिशाभूल करणारे ठरू शकते.

### शहरहितासाठी संतुलित भूमिका आवश्यक

मोशीकरांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होता कामा नये. त्याचबरोबर शहराच्या स्वच्छतेशीही तडजोड होऊ नये. त्यामुळे प्रकल्पाला विरोध करण्याऐवजी तो अधिक सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि लोकसहभागातून पारदर्शक कसा होईल, यावर चर्चा होणे आवश्यक आहे. मोशी दुर्घटनेचे राजकारण करून शहराला कचऱ्याच्या संकटात ढकलणे हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही. पिंपरी-चिंचवडसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या शहराला भावनिक घोषणांपेक्षा शाश्वत आणि वैज्ञानिक उपायांची गरज आहे.

# डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, आकुर्डीचे प्लेसमेंटमध्ये घवघवीत यश

**महाईन्यूज** |
पिंपरी- चिंचवड

**गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्यविकास आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाच्या बळावर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, आकुर्डीने शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्लेसमेंटच्या क्षेत्रात घवघवीत यश संपादन केले आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांमध्ये संकुलातील विद्यार्थ्यांची निवड झाली.**



यंदा विद्यार्थ्यांनी सरासरी ६ ते १५ लाख रुपये वार्षिक (एलपीए) वेतन पॅकेज मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.

आजच्या स्पर्धात्मक आणि कौशल्याधारित भरती प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर सायबर सिक्युरिटी, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, डेटा ॲनॅलिटिक्स यांसारख्या उच्च मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये संकुलातील विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटविला आहे. इंजिनिअरिंग, फार्मसी, एमबीए, एमसीए, पीजीडीएम तसेच पॉलिटेक्निक विभागातील विद्यार्थ्यांच्या मुलाखती विविध प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. व्होडाफोन, दीपक फर्टिलायझर्स, बीएनवाय मेलॉन, कॅपजेमिनी, फोर्स मोटर्स, विप्रो, डसॉल्ट सिस्टिम्स, गोदरेज, सुल्झर, किर्लोस्कर, बॉश, एचएसबीसी टेक्नॉलॉजी, इन्फोब्लॉक्स, आरटीकॅम्प, पॉलीकॅब आणि ह्युंदाई इंडिया यांसारख्या नामांकित कंपन्यांनी संकुलातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. गतवर्षी विद्यार्थ्यांनी २७ लाख रुपये वार्षिक (एलपीए) इतके सर्वोच्च वेतन पॅकेज मिळवून दिलेल्या उज्ज्वल परंपरेचा वारसा यंदाही कायम राखण्यात यश आले आहे. विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाच्या अपेक्षा, आधुनिक भरती प्रक्रियेतील बदल आणि प्लेसमेंटसाठी आवश्यक कौशल्यांची माहिती मिळावी, यासाठी अभियांत्रिकी, एमबीए आणि पीजीडीएम विभागातील विद्यार्थ्यांसाठी कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत एचआर सिम्पोजियमचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्राच्या गरजा, कौशल्याधारित भरती प्रक्रिया, करिअर नियोजन तसेच प्रभावी मुलाखत तंत्र याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. परिणामी, विद्यार्थ्यांचा प्लेसमेंटकडे पाहण्याचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे. अत्याधुनिक प्रयोगशाळा, जागतिक दर्जाच्या शैक्षणिक सुविधा, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण आणि उद्योगाभिमुख इंटर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जात आहे. त्यामुळेच उद्योगविश्वाच्या अपेक्षांनुसार सक्षम आणि कौशल्यसंपन्न मनुष्यबळ घडविण्यात संकुल सातत्याने यशस्वी ठरत आहे. या उल्लेखनीय यशासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, ट्रस्टी तेजस पाटील, कॅम्पस संचालक रिअर ॲडमिरल अमित विक्रम (निवृत्त), प्राचार्य, डीन प्लेसमेंट्स प्रा. जस्मिता कौर तसेच सर्व विभागप्रमुख आणि प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशाचे पंख देत गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उत्कृष्ट प्लेसमेंटची उज्ज्वल परंपरा जपणारे शैक्षणिक केंद्र म्हणून डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, आकुर्डीने पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख अधोरेखित केली आहे.

> आजच्या वेगाने बदलणाऱ्या आणि कौशल्याधारित जगात विद्यार्थ्यांना केवळ पदवी प्रदान करणे हे आमचे उद्दिष्ट नाही, तर त्यांना जागतिक स्तरावर सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि उद्योगविश्वाच्या अपेक्षांना पूर्ण करणारे व्यावसायिक म्हणून घडविणे ही आमची बांधिलकी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाधारित प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि उद्योग क्षेत्राशी असलेली भक्कम भागीदारी यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या कठोर परिश्रमाचे, प्राध्यापकांच्या समर्पित मार्गदर्शनाचे आणि संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेचे फलित आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या स्वप्नांना यशाचे पंख देत त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम करणे, हेच आमचे ध्येय राहील.
>
> **– डॉ. संजय डी. पाटील, अध्यक्ष, डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुल, आकुर्डी, पुणे.**